जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 OCT 2026 तरुण भारत

जागतिक आघाडीच्या दोन टक्क्यांमध्ये विद्यापीठाचे २३ संशोधक

प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, माजी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांचा समावेश : विद्यापीठासाठी भूषणावह बाब

जनप्रवास : कोल्हापूर

जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांची या वर्षाची यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने जाहीर केली असून त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह २३ संशोधक, प्राध्यापकांना मानांकन प्राप्त झाले आहे.

स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या जागतिक स्तरावरील दोन टक्के आघाडीच्या संशोधकांच्या यादीमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी आपले स्थान सातत्यपूर्ण पद्धतीने कायम राखले आहे. यंदाही त्यांना पुनर्मानांकन लाभले आहे. या यादीमध्ये विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ.



डॉ. ज्योती जाधव प्रमोद पाटील

ज्योती जाधव (जैवरसायनशास्त्र), माजी प्र-कुलगुरू प्रा. प्रमोद पाटील (पदार्थविज्ञान), प्रा. केशव राजपुरे (पदार्थविज्ञान), डॉ. सागर डेळेकर (रसायनशास्त्र), प्रा. ए. व्ही. राव (पदार्थविज्ञान), प्रा. संजय गोविंदवार (पदार्थविज्ञान), प्रा. चंद्रकांत भोसले (पदार्थविज्ञान), डॉ. आण्णासाहेब मोहोळकर (पदार्थविज्ञान), प्रा. हेमराज यादव (रसायनशास्त्र), डॉ. सचिन ओतारी (नॅनोतंत्रज्ञान), प्रा. कल्याणराव गरडकर (रसायनशास्त्र), प्रा. तुकाराम डोंगळे (इलेक्ट्रॉनिक मटेरियल्स), डॉ. सुशीलकुमार जाधव (पदार्थविज्ञान), प्रा. विश्वास बापट (जैवतंत्रज्ञान), डॉ. नीलेश तरवाळ (पदार्थविज्ञान), प्रा. अनिल घुले (रसायनशास्त्र), डॉ. कृष्णा पवार (पदार्थविज्ञान), डॉ. तेजस्विनी भट (पदार्थविज्ञान) आणि डॉ. मानसिंग टाकळे (पदार्थविज्ञान) यांचा समावेश आहे. याशिवाय, या यादीत डॉ. सचिन भालेकर (गणित), डॉ. संजय लठ्ठे (पदार्थविज्ञान), डॉ. विठोबा पाटील (पदार्थविज्ञान) आणि डॉ. शरदराव व्हनाळकर (पदार्थविज्ञान) या माजी विद्यार्थी, शिक्षकांचाही समावेश आहे.

सार्वकालिक कामगिरीच्या यादीत प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. सुशीलकुमार जाधव, डॉ. केशव राजपुरे, निवृत्त शिक्षक डॉ. ए. व्यंकटेश्वरा राव, डॉ. सी. डी. लोखंडे, डॉ. चंद्रकांत भोसले, डॉ. संजय गोविंदवार, डॉ. विश्वास बापट यांचा समावेश आहे.

▸ पान ४ वर

संशोधनातील सातत्यपूर्ण कामगिरीचे फलित: कुलगुरू कामत

शिवाजी विद्यापीठातील संशोधक सलगपणे दरवर्षी जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांच्या यादीमध्ये स्थान प्राप्त करीत आहेत. त्याला त्यांची सातत्यपूर्ण संशोधकीय कामगिरी कारणीभूत आहे. ही बाब विद्यापीठासाठी अत्यंत बहुमानास्पद असून नवसंशोधकांना प्रेरणा देणारी आहे. या सर्व संशोधकांचे मी मनापासून अभिनंदन करतो. यापुढील काळातही त्यांच्याकडून आणि त्यांच्या विद्यार्थ्यांकडून अशीच उज्ज्वल कामगिरी नोंदविली जावी, यासाठी त्यांना शुभेच्छाही देतो, अशा शब्दात कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी या संशोधकांचे कौतुक केले आहे.

जागतिक आघाडीच्या दोन टक्क्यांमध्ये शिवाजी विद्यापीठाचे २३ संशोधक

▸ पान १ वरून : 'स्कोपस' डेटाबेसवर आधारित 'एल्सव्हिअर'ने तयार केलेल्या या यादीसाठी सन १९६० ते २०२६ या कालावधीमध्ये संशोधकीय योगदान देणाऱ्या संशोधकांचा सार्वकालिक कामगिरी आणि वार्षिक कामगिरी अशा दोन निकषांवर विचार करण्यात आला आहे. २२ विज्ञान विषय आणि १७६ उपविषयांमधील संशोधनाची दखल त्याअंतर्गत घेतली गेली आहे. शोधनिबंधांची संख्या आणि दर्जा, संशोधन पत्रिकेचा दर्जा, शोधनिबंधाला प्राप्त झालेली सायटेशन्स, एकच लेखक असणारे शोधनिबंध, स्वतःची सायटेशन्स वगळून असणारे शोधनिबंध अशा अनेक काटेकोर निकषांवर आधारित ही यादी जाहीर केली जाते. महत्त्वाची बाब म्हणजे २०२६च्या जागतिक आघाडीच्या २% संशोधकांच्या डेटाबेसमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान अधिविभागाच्या सर्वाधिक संशोधकांनी स्थान मिळविले आहे. ही विद्यापीठाच्या दृष्टीने अत्यंत भूषणावह बाब आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2026

सकाळ

जागतिक संशोधनात शिवाजी विद्यापीठाचा झेंडा

'स्टॅनफोर्ड'च्या यादीत डॉ. जाधव यांच्यासह २३ जणांना मानांकन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांची या वर्षाची यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने जाहीर केली असून, त्यात शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह २३ संशोधक, प्राध्यापकांना मानांकन मिळाले आहे. विशेष म्हणजे या यादीत माजी संशोधक विद्यार्थ्यांनाही स्थान मिळाले आहे.

स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या जागतिक स्तरावरील दोन टक्के आघाडीच्या संशोधकांच्या यादीत शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी स्थान सातत्यपूर्ण पद्धतीने कायम राखले आहे. यंदाही त्यांना पुनर्मानांकन मिळाले आहे. यादीत विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव (जैवरसायनशास्त्र), माजी प्र-कुलगुरू प्रा. पी. एस. पाटील (पदार्थविज्ञान), प्रा. केशव राजपुरे (पदार्थविज्ञान), डॉ. सागर डेळेकर (रसायनशास्त्र), प्रा. ए. व्ही. राव (पदार्थविज्ञान), प्रा. संजय गोविंदवार (पदार्थविज्ञान), प्रा. चंद्रकांत भोसले (पदार्थविज्ञान), डॉ. आण्णासाहेब मोहोळकर (पदार्थविज्ञान), प्रा. हेमराज यादव (रसायनशास्त्र), डॉ. सचिन ओतारी (नॅनोतंत्रज्ञान), प्रा. कल्याणराव गरडकर (रसायनशास्त्र), प्रा. तुकाराम डोंगळे (इलेक्ट्रॉनिक



डॉ. ज्योती जाधव

मटेरियल्स), डॉ. सुशीलकुमार जाधव (पदार्थविज्ञान), प्रा. विश्वास बापट (जैवतंत्रज्ञान), डॉ. नीलेश तरवाळ (पदार्थविज्ञान), प्रा. अनिल घुले (रसायनशास्त्र), डॉ. कृष्णा पवार (पदार्थविज्ञान), डॉ. तेजस्विनी भट (पदार्थविज्ञान) आणि डॉ. मानसिंग टाकळे (पदार्थविज्ञान) यांचा समावेश आहे. याशिवाय, या यादीत डॉ. सचिन भालेकर (गणित), डॉ. संजय लठ्ठे (पदार्थविज्ञान), डॉ. विठोबा पाटील (पदार्थविज्ञान) आणि डॉ. शरदराव व्हनाळकर (पदार्थविज्ञान) यांचाही समावेश आहे. करिअर परफॉर्मन्स अर्थात सार्वकालिक कामगिरीच्या यादीत प्र-कुलगुरू डॉ. जाधव, डॉ. पाटील, डॉ. सुशीलकुमार जाधव, डॉ. केशव राजपुरे, निवृत्त शिक्षक डॉ. ए. व्यंकटेश्वरा राव, डॉ. सी. डी. लोखंडे, डॉ. चंद्रकांत भोसले, डॉ. संजय गोविंदवार, डॉ. विश्वास बापट यांचा समावेश आहे.

'स्कोपस' डेटाबेसवर आधारित 'एल्सव्हिअर'ने तयार केलेल्या या यादीसाठी १९६० ते २०२६ या कालावधीत संशोधकीय योगदान देणाऱ्या संशोधकांचा सार्वकालिक कामगिरी आणि वार्षिक कामगिरी अशा दोन निकषांवर विचार केला आहे. २२ विज्ञान विषय आणि १७६ उपविषयांमधील संशोधनाची दखल त्याअंतर्गत घेतली आहे. शोधनिबंधांची संख्या आणि दर्जा, संशोधन पत्रिकेचा दर्जा, शोधनिबंधाला प्राप्त झालेली सायटेशन्स, एकच लेखक असणारे शोधनिबंध, स्वतःची सायटेशन्स वगळून असणारे शोधनिबंध अशा अनेक काटेकोर निकषांवर आधारित ही यादी जाहीर केली जाते. महत्त्वाची बाब म्हणजे २०२६ च्या जागतिक आघाडीच्या २ टक्के संशोधकांच्या डेटाबेसमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान अधिविभागाच्या सर्वाधिक संशोधकांनी स्थान मिळविले आहे.

> संशोधनातील सातत्यपूर्ण कामगिरीचे फलित शिवाजी विद्यापीठातील संशोधकांची सातत्यपूर्ण संशोधकीय महत्त्वपूर्ण आहे. ही बाब विद्यापीठासाठी बहुमानास्पद असून, नवसंशोधकांना प्रेरणा देणारी आहे. यापुढील काळातही त्यांच्याकडून आणि त्यांच्या विद्यार्थ्यांकडून उज्ज्वल कामगिरी नोंदविली जावी.
>
> **- कुलगुरू डॉ. आर. के. कामत.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 OCT 2026 लोकमत

जागतिक आघाडीच्या २ टक्के संशोधकांत शिवाजी विद्यापीठाचे तब्बल २३ संशोधक

ज्योती जाधव, पी. एस. पाटील यांच्यासह माजी विद्यार्थी, शिक्षकांचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : जागतिक स्तरावरील आघाडीच्या दोन टक्के संशोधकांची यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने जाहीर केली असून, त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या २३ संशोधकांना स्थान मिळाले आहे. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, माजी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह विज्ञान शाखांतील संशोधकांचा यात समावेश आहे. विशेष म्हणजे, विद्यापीठातील माजी संशोधक विद्यार्थी आणि शिक्षकांनीही या यादीत स्थान मिळविले आहे.

या यादीत पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, जैवरसायनशास्त्र, नॅनोतंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, गणित आणि इलेक्ट्रॉनिक मटेरियल्स या विषयांतील संशोधकांचा समावेश आहे. शोधनिबंधांची संख्या, विश्लेषण अशा विविध निकषांचा विचार मूल्यमापन केले जाते. डॉ. सागर डेळेकर, डॉ. आण्णासाहेब मोहोळकर, प्रा. हेमराज यादव, डॉ. सचिन ओतारी, प्रा. कल्याणराव गरडकर, प्रा. तुकाराम डोंगळे, डॉ. नीलेश तरवाळ, प्रा. अनिल घुले, डॉ. कृष्णा पवार, डॉ. तेजस्विनी भट आणि डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. सचिन भालेकर, डॉ. संजय लठ्ठे, डॉ. विठोबा पाटील आणि डॉ. शरदराव व्हनाळकर या माजी शिक्षकांचाही समावेश यात आहे.

सार्वकालिक कामगिरी



ज्योती जाधव

संशोधकांच्या सार्वकालिक कामगिरीच्या यादीत प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. सुशीलकुमार जाधव, डॉ. केशव राजपुरे, डॉ. ए. व्यंकटेश्वरा राव, डॉ. सी. डी. लोखंडे, डॉ. चंद्रकांत भोसले, डॉ. संजय गोविंदवार आणि डॉ. विश्वास बापट यांचा समावेश आहे.

> **शिवाजी विद्यापीठातील संशोधक सातत्याने जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांच्या यादीत स्थान मिळवत आहेत, ही बाब विद्यापीठासाठी अभिमानास्पद असून नवसंशोधकांना प्रेरणा देणारी आहे.**
>
> **डॉ. राजनीश कामत, कुलगुरू**

11 OCT 2026

पुढारी

जागतिक आघाडीच्या संशोधकात शिवाजी विद्यापीठाचे २३ संशोधक

प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, माजी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांचा समावेश

> शिवाजी विद्यापीठातील संशोधक सातत्याने जागतिक यादीत स्थान मिळवत आहे, ही विद्यापीठासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या कामगिरीतून नवसंशोधकांना प्रेरणा मिळेल, त्यांना पुढील संशोधनासाठी शुभेच्छा.
> **– डॉ. आर.के. कामत,** कुलगुरु

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



डॉ. ज्योती जाधव

अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने जाहीर केलेल्या जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांच्या २०२६च्या यादीत शिवाजी विद्यापीठातील २३ संशोधक व प्राध्यापकांनी स्थान मिळविले आहे. यात प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव व माजी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह माजी विद्यार्थी व शिक्षकांचा समावेश आहे.

यादीमध्ये प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव (जैवरसायनशास्त्र), माजी प्र-कुलगुरू प्रा. प्रमोद पाटील (पदार्थविज्ञान), प्रा. केशव राजपुरे (पदार्थविज्ञान), डॉ. सागर डेळेकर (रसायनशास्त्र), प्रा. ए. व्ही. राव (पदार्थविज्ञान), प्रा. संजय गोविंदवार (पदार्थविज्ञान), प्रा. चंद्रकांत भोसले (पदार्थविज्ञान), डॉ. आण्णासाहेब मोहोळकर (पदार्थविज्ञान), प्रा. हेमराज यादव (रसायनशास्त्र), डॉ. सचिन ओतारी (नॅनोतंत्रज्ञान), प्रा. कल्याणराव गरडकर (रसायनशास्त्र), प्रा. तुकाराम डोंगळे (इलेक्ट्रॉनिक मटेरियल्स), डॉ. सुशीलकुमार जाधव (पदार्थविज्ञान), प्रा. विश्वास बापट (जैवतंत्रज्ञान), डॉ. नीलेश तरवाळ (पदार्थविज्ञान), प्रा. अनिल घुले (रसायनशास्त्र), डॉ. कृष्णा पवार (पदार्थविज्ञान), डॉ. तेजस्विनी भट (पदार्थविज्ञान) आणि डॉ. मानसिंग टाकळे (पदार्थविज्ञान) यांचा समावेश आहे. याशिवाय, या यादीत डॉ. सचिन भालेकर (गणित), डॉ. संजय लठ्ठे (पदार्थविज्ञान), डॉ. विठोबा पाटील (पदार्थविज्ञान) व डॉ. शरदराव व्हनाळकर (पदार्थविज्ञान) यांचा समावेश आहे.

संशोधकांच्या वार्षिक आणि सार्वकालिक कामगिरीचा विचार केला जातो. शोधनिबंधांची संख्या व गुणवत्ता, त्यांना मिळालेले संदर्भ व संशोधनाचे योगदान अशा विविध निकषांवर हे मानांकन निश्चित केले जाते. करिअर परफॉर्मन्स अर्थात सार्वकालिक कामगिरीच्या यादीत प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. सुशीलकुमार जाधव, डॉ. केशव राजपुरे, निवृत्त शिक्षक डॉ. ए. व्यंकटेश्वरा राव, डॉ. सी. डी. लोखंडे, डॉ. चंद्रकांत भोसले, डॉ. संजय गोविंदवार, डॉ. विश्वास बापट यांचा समावेश आहे.

11 OCT 2026


तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाची कामगिरी; प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. प्रमोद पाटील यांचा समावेश

जागतिक यादीत २३ संशोधक

जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह २३ संशोधक, प्राध्यापकांना मानांकन प्राप्त झाले आहे. विशेष म्हणजे या यादीत माजी संशोधक विद्यार्थ्यांनाही स्थान लाभले आहे. यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या लौकिकात मोठी भर पडली आहे.



- 'स्टॅनफोर्ड'ने प्रसिद्ध केली जागतिक आघाडीच्या संशोधकांची यादी
- विद्यापीठाच्या चार माजी विद्यार्थी आणि शिक्षकांचीही भरारी
- विद्यापीठाच्या लौकिकात मोलाची भर

संशोधनातील सातत्यपूर्ण कामगिरीचे फलित

शिवाजी विद्यापीठातील संशोधक सलगपणे दरवर्षी जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांच्या यादीमध्ये स्थान प्राप्त करीत आहेत. त्याला त्यांची सातत्यपूर्ण संशोधकीय कामगिरी कारणीभूत आहे. ही बाब नवसंशोधकांना प्रेरणा देणारी आहे. सर्व संशोधकांच्या मेहनतीचे फलित आहे. पुढील काळातही संशोधक व विद्यार्थ्यांकडून अशीच उज्जवल कामगिरी नोंदविली जावी.

■कुलगुरू डॉ. राजनीश कामत, शिवाजी विद्यापीठ.

| त. भा. प्रतिनिधी

कोल्हापूर : स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या जागतिक स्तरावरील दोन टक्के आघाडीच्या संशोधकांच्या यादीमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी आपले स्थान सातत्यपूर्ण पद्धतीने कायम राखले आहे. यंदाही त्यांना पुनर्मानांकन लाभले आहे. या यादीमध्ये **डॉ. ज्योती जाधव** विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव (जैवरसायनशास्त्र), माजी प्र-कुलगुरू प्रा. प्रमोद पाटील (पदार्थविज्ञान), प्रा. केशव राजपुरे (पदार्थविज्ञान), डॉ. सागर डेळेकर (रसायनशास्त्र), प्रा. ए. व्ही. राव (पदार्थविज्ञान), प्रा. संजय गोविंदवार (पदार्थविज्ञान), प्रा. चंद्रकांत भोसले (पदार्थविज्ञान), डॉ. आण्णासाहेब मोहोळकर (पदार्थविज्ञान), प्रा. हेमराज यादव (रसायनशास्त्र), डॉ. सचिन ओतारी (नॅनोतंत्रज्ञान), प्रा. कल्याणराव गरडकर (रसायनशास्त्र), प्रा. तुकाराम डोंगळे (इलेक्ट्रॉनिक मटेरियल्स), डॉ. सुशीलकुमार जाधव (पदार्थविज्ञान), प्रा. विश्वास बापट (जैवतंत्रज्ञान), डॉ. नीलेश तरवाळ (पदार्थविज्ञान), प्रा. अनिल घुले (रसायनशास्त्र), डॉ. कृष्णा पवार (पदार्थविज्ञान), डॉ. विठोबा पाटील (पदार्थविज्ञान) आणि डॉ. शरदराव व्हनाळकर (पदार्थविज्ञान) या माजी विद्यार्थी, शिक्षकांचाही समावेश आहे. करिअर परफॉर्मन्स अर्थात सार्वकालिक कामगिरीच्या यादीत प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. सुशीलकुमार जाधव, डॉ. केशव राजपुरे, निवृत्त शिक्षक डॉ. ए. व्यंकटेश्वरा राव, डॉ. सी.डी. लोखंडे, डॉ. चंद्रकांत भोसले, डॉ. संजय गोविंदवार, डॉ. विश्वास बापट यांचा समावेश आहे.



'स्कोपस' डेटाबेसवर आधारित 'एल्सव्हिअर'ने तयार केलेल्या या यादीसाठी सन १९६० ते २०२६ या कालावधीमध्ये संशोधकीय योगदान देणाऱ्या संशोधकांचा सार्वकालिक कामगिरी आणि वार्षिक कामगिरी अशा दोन निकषांवर विचार करण्यात आला आहे. २२ विज्ञान विषय आणि १७६ उपविषयांमधील संशोधनाची दखल त्याअंतर्गत घेतली गेली आहे. शोधनिबंधांची संख्या आणि दर्जा, संशोधन पत्रिकेचा दर्जा, शोधनिबंधाला प्राप्त झालेली सायटेशन्स, एकच लेखक असणारे शोधनिबंध, स्वत:ची सायटेशन्स वगळून असणारे शोधनिबंध अशा अनेक काटेकोर निकषांवर आधारित ही यादी जाहीर केली जाते.

याशिवाय, या यादीत डॉ. सचिन भालेकर (गणित), डॉ. संजय लठ्ठे (पदार्थविज्ञान), डॉ. तेजस्विनी भट (पदार्थविज्ञान) आणि डॉ. मानसिंग टाकळे (पदार्थविज्ञान) यांचा समावेश आहे.

11 OCT 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर

जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांत विद्यापीठाचे २३ जण

प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, माजी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांचा समावेश

कोल्हापूर : प्रतिनिधी

जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांची या वर्षाची यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने जाहीर केली. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह २३ संशोधक, प्राध्यापकांना मानांकन प्राप्त झाले आहे. विशेष म्हणजे या यादीत माजी संशोधक विद्यार्थ्यांनाही स्थान लाभले आहे.

स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या जागतिक स्तरावरील दोन टक्के आघाडीच्या संशोधकांच्या यादीमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी आपले स्थान सातत्यपूर्ण पद्धतीने कायम राखले. यंदाही त्यांना पुनर्मानांकन लाभले आहे. या यादीमध्ये विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ.



डॉ. ज्योती जाधव

ज्योती जाधव (जैव रसायनशास्त्र), माजी प्र-कुलगुरू प्रा. प्रमोद पाटील (पदार्थविज्ञान), प्रा. केशव राजपुरे (पदार्थविज्ञान), डॉ. सागर डेळेकर (रसायनशास्त्र), प्रा. ए. व्ही. राव (पदार्थविज्ञान), प्रा. संजय गोविंदवार (पदार्थविज्ञान), प्रा. चंद्रकांत भोसले (पदार्थविज्ञान), डॉ. आण्णासाहेब मोहोळकर (पदार्थविज्ञान), प्रा. हेमराज यादव (रसायनशास्त्र), डॉ. सचिन ओतारी (नॅनो तंत्रज्ञान), प्रा. कल्याणराव गरडकर (रसायनशास्त्र), प्रा. तुकाराम डोंगळे (इलेक्ट्रॉनिक मटेरियल्स), डॉ. सुशीलकुमार जाधव (पदार्थविज्ञान), प्रा. विश्वास बापट (जैव तंत्रज्ञान), डॉ. नीलेश तरवाळ (पदार्थविज्ञान), प्रा. अनिल घुले (रसायनशास्त्र), डॉ. कृष्णा पवार (पदार्थविज्ञान), डॉ. तेजस्विनी भट (पदार्थविज्ञान) आणि डॉ. मानसिंग टाकळे (पदार्थविज्ञान) यांचा समावेश आहे. याशिवाय, या यादीत डॉ. सचिन भालेकर (गणित), डॉ. संजय लठ्ठे (पदार्थविज्ञान), डॉ. विठोबा पाटील (पदार्थविज्ञान) आणि डॉ. शरदराव व्हनाळकर (पदार्थविज्ञान) या माजी विद्यार्थी, शिक्षकांचाही समावेश आहे.

'स्कोपस' डेटाबेसवर आधारित 'एल्सव्हिअर'ने तयार केलेल्या या यादीसाठी सन १९६० ते २०२६ या कालावधीमध्ये संशोधकीय योगदान देणाऱ्या संशोधकांचा सार्वकालिक कामगिरी आणि वार्षिक कामगिरी अशा दोन निकषांवर विचार करिअर परफॉर्मन्स अर्थात सार्वकालिक कामगिरीच्या यादीत प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. सुशीलकुमार जाधव, डॉ. केशव राजपुरे, निवृत्त शिक्षक डॉ. ए. व्यंकटेश्वरा राव, डॉ. सी. डी. लोखंडे, डॉ. चंद्रकांत भोसले, डॉ. संजय गोविंदवार, डॉ. विश्वास बापट यांचा समावेश आहे.

संशोधनातील सातत्यपूर्ण कामगिरीचे फलित

शिवाजी विद्यापीठातील संशोधक सलगपणे दरवर्षी जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांच्या यादीमध्ये स्थान प्राप्त करत आहेत. त्याला त्यांची सातत्यपूर्ण संशोधकीय कामगिरी कारणीभूत आहे. ही बाब विद्यापीठासाठी बहुमानास्पद असून, नवसंशोधकांना प्रेरणा देणारी आहे, अशा शब्दांत कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी या संशोधकांचे कौतुक केले.

करण्यात आला आहे. २२ विज्ञान विषय आणि १७६ उपविषयांमधील संशोधनाची दखल त्याअंतर्गत घेतली गेली आहे.

जनसंपर्क कक्ष
11 OCT 2026
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी

पश्चिम घाटाच्या जैवविविधतेचे संवर्धनाची गरज : प्रा. शिंपले

कोल्हापूर : प्रतिनिधी

पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी, जलस्त्रोतांचे संरक्षण करण्यासाठी आणि नैसर्गिक परिसंस्था टिकवण्यासाठी पश्चिम घाटातील जैवविविधतेचे संवर्धन करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन न्यू कॉलेजचे प्रा. विनोद शिंपले यांनी केले.

विवेकानंद कॉलेजचा वनस्पतीशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या संयुक्त विद्यमाने 'पश्चिम घाटातील जैवविविधता आणि तिच्या संवर्धनाची गरज' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते.

प्रभारी प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील अध्यक्षस्थानी होते. जंगलतोड, अनियंत्रित विकास, खाणकाम, जंगलातील वणवे आणि हवामान बदलामुळे या जैवविविधतेवर विपरीत परिणाम होत आहे. या नैसर्गिक संपत्तीच्या संरक्षणासाठी वनसंपत्तीचे जतन, स्थानिक वनस्पतींचे संवर्धन, पर्यावरणविषयक जनजागृती आणि लोकसहभाग आवश्यक आहे, असेही प्रा. शिंपले म्हणाले. वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांनी प्रास्ताविक केले. दहीफळे यांनी आभार मानले.

11 OCT 2026

पुढारी

तीन दृष्टिदिव्यांग विद्यार्थ्यांचा एमए इतिहास अभ्यासक्रमास प्रवेश

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

जिद्द, चिकाटी व आत्मविश्वासाच्या बळावर तीन दृष्टिदिव्यांग विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रात एम.ए. भाग-१ (इतिहास) अभ्यासक्रमास प्रवेश घेतला आहे. विद्यार्थ्यांच्या प्रवेशामुळे समावेशक शिक्षणाच्या दिशेने विद्यापीठाचे महत्त्वपूर्ण पाऊल अधोरेखित झाले आहे.

हणबरवाडी येथील अंध युवक मंच संचलित अंध मुला-मुलींच्या निवासी वसतिगृहातील पवन कागले, विकास पाईकराव व सांगली जिल्ह्यातील पलूस येथील अशोक चौगुले या विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणासाठी दूरशिक्षणाचा पर्याय निवडला. अशोक चौगुले यांनी यापूर्वी याच केंद्रातून समाजशास्त्र व राज्यशास्त्र या विषयात एम.ए. पदवी प्राप्त केली आहे.

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य, शैक्षणिक मार्गदर्शन, संपर्क सत्रे व ऑनलाईन सुविधांद्वारे शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जाते. या उपक्रमामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाच्या संधी अधिक व्यापक होत असून, इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार आहे. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, संचालक डॉ. प्रतिभा पाटणकर, उपकुलसचिव विनय शिंदे, समन्वयक डॉ. कृष्णा पाटील, दिलीप मोहाडीकर, इतिहास विषयाचे डॉ. मुफिद मुजावर यांनी अभिनंदन केले.

11 OCT 2026

लोकमत

महावीर महाविद्यालयात टीईटी मार्गदर्शन कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिक्षक होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना सीटीईटी आणि टीईटी परीक्षांच्या तयारीसाठी योग्य दिशा मिळावी, या उद्देशाने महावीर महाविद्यालयात राज्यस्तरीय मोफत मार्गदर्शन कार्यशाळा झाली. यामध्ये १५० प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला. प्राचार्य डॉ. अद्वैत जोशी व मान्यवरांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले.

अभ्यासाचे नियोजन कसे करावे, विविध विषयांचा अभ्यास कसा करावा आणि अध्यापनाशी संबंधित संकल्पना कशा समजून घ्याव्यात, याबाबत उपयुक्त माहिती मिळाली. डॉ. शशिकांत अनदाते, डॉ. अंकुश बनसोडे, डॉ. बी. डी. पाटील, डॉ. सुषमा चौगुले, प्रा. अजितकुमार चौगुले, डॉ. सरिता मोरे, प्रा. यमुना येरोळकर, प्रा. सुलभा सुतार, प्रा. संजय खांडेकर आणि प्रा. सूरज चौगुले यांनी मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. रवींद्र मिरजकर, प्रा. डॉ. श्रद्धा पाटील, डॉ. महादेव शिंदे, प्राचार्य डॉ. अद्वैत जोशी यांचे मार्गदर्शन लाभले.

माजी विद्यार्थी संघाचे समन्वयक डॉ. अंकुश बनसोडे, मार्गदर्शक प्रा. जयवंत दळवी, सचिव बसवराज वस्त्रद आणि अध्यक्ष प्रियांका पाटील यांनी परिश्रम घेतले. (वा.प्र.)

जनसंपर्क कक्ष
11 OCT 2026
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

विवेकानंद महाविद्यालयाची बास्केट बॉलमध्ये बाजी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठांतर्गत लोकनेते शरद पाटील महाविद्यालय, मिरज येथे आयोजित आंतरविभागीय महिला बास्केटबॉल स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालयाने द्वितीय क्रमांक पटकावला. महाविद्यालयाने सलग दुसऱ्या वर्षी स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली. स्पर्धेत १२ संघांनी सहभाग घेतला.

संघात भाग्यश्री अंबी, श्रुती भोसले, ज्ञानेश्वरी हिलगे, श्रद्धा गुंजाटे, भक्ती गुंजाटे, महेक मुल्ला, इशा जाधव, श्रावणी बोडके, कोमल चौगुले; हर्षली चव्हाण, निकिता मगदूम आणि वैष्णवी बोडेकर या खेळाडूंचा समावेश होता. यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, डॉ. सी. बी. पाटील, डॉ. एकनाथ आळवेकर, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

11 OCT 2026

पुढारी

प्रार्थना संगीत ही जीवन उन्नतीची दिशा : कुंटे

विद्यापीठात 'प्रार्थना संगीत' विषयावर व्याख्यान

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

प्रार्थना संगीत ही जीवन उन्नतीची दिशा आहे. प्रार्थनेतून माणसा-माणसांतील परस्परसंबंध अधिक दृढ होतात, असे प्रतिपादन संगीताचार्य प्रा. केशवचैतन्य कुंटे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे आयोजित 'प्रार्थना संगीत' विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. नंदकुमार मोरे होते.

प्रा. कुंटे म्हणाले, प्रार्थना ही संगीताचा पाया असून कर्णमधुरता व उत्कट भावनाशील अभिव्यक्ती हे तिचे महत्त्वाचे घटक आहेत. प्रार्थनेमुळे जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याची वृत्ती निर्माण होते. परस्परांप्रती प्रेम आणि पूज्यताबुद्धी वाढते. सर्व मनुष्य समान असल्याचा भावही प्रार्थनेतून व्यक्त होतो. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी प्रार्थना समाजाच्या माध्यमातून हा विचार समाजात रुजविला. करुणेच्या



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात बोलताना प्रा. केशवचैतन्य कुंटे.

किरणांनी भरलेले जग त्यांनी स्वीकारले.

डॉ. मोरे म्हणाले, माणूस पूर्वी भटका होता. विविध संस्कृतींच्या संयोगातून विचार आणि परंपरांची देवाणघेवाण झाली. प्रार्थना संगीत हे त्याचे प्रगत रूप आहे. प्रार्थना मानवी सद्भावनेचा अखंड झरा असून अंतःशुद्ध चैतन्याचा अनुभव देणारी शक्ती आहे. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. पंडित सुधीर पोटे यांनी परिचय करून दिला. अनिता मिस्कूळ यांनी सूत्रसंचालन केले. स्नेहल तावडे यांनी आभार मानले.

11 OCT 2026
पुढारी

कमला कॉलेजमध्ये राष्ट्रीय चर्चासत्र उत्साहात

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

कमला कॉलेजमध्ये एकदिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र उत्साहात पार पडले. चर्चासत्राचे उद्घाटन माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते झाले तर अध्यक्षस्थानी डॉ. क्रांतिकुमार पाटील होते.

चर्चासत्रात डॉ. साळुंखे यांनी वित्तीय शिक्षण, वित्तीय साक्षरता, आर्थिक स्वावलंबन आणि सायबर सुरक्षेचे महत्त्व अधोरेखित केले. तर चर्चासत्राचे उद्दिष्ट व सद्य:स्थितीत वित्तीय शिक्षणाची आवश्यकता याविषयी संयोजक डॉ. सागर वाळवेकर यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी सचिव प्राजक्त पाटील, प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर, उपाध्यक्ष डॉ. एस. एन. पवार, सहसंयोजक निलेश क्षीरसागर उपस्थित होते. चर्चासत्रात विविध राज्यांतील प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 OCT 2026 जनप्रवास

प्रत्येकाच्या जीवनात आर्थिक निर्णय महत्वपूर्ण

शिवाजी विद्यापीठ माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांचे प्रतिपादन

जनप्रवास : कोल्हापूर

आर्थिक व्यवहारांचे ज्ञान, पैशाचे योग्य नियोजन, बचत, गुंतवणूक आणि आर्थिक निर्णय घेताना आवश्यक असलेली सजगता या बाबी प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ, माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.

कमला कॉलेजमधील आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. 'वित्तीय शिक्षण, साक्षरता व वर्तन' हा त्यांच्या चर्चासत्राचा विषय होता. अध्यक्षस्थानी ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील होते.

डॉ. साळुंखे म्हणाले, वित्तीय साक्षरतेमुळे व्यक्तीला आर्थिक संधींचा योग्य उपयोग करता येतो आणि आर्थिक फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण करता येते, असे त्यांनी नमूद केले. डिजिटल व्यवहारांच्या वाढत्या वापराच्या पार्श्वभूमीवर सायबर सुरक्षेबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याचा उल्लेख करून स्वावलंबनाच्या विचाराला मिळणाऱ्या प्रेरणेवर प्रकाश टाकला.



कमला कॉलेजमधील चर्चासत्रात मार्गदर्शन करताना माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे. सोबत डॉ. क्रांतिकुमार पाटील, डॉ. एस. एन. पवार, प्राजक्त पाटील, डॉ. तेजस्विनी मुडेकर आदी.

डॉ. सागर वाळवेकर यांनी चर्चासत्राचे महत्त्व, उद्दिष्टे आणि सद्यस्थितीतील वित्तीय शिक्षणाची आवश्यकता याविषयी माहिती दिली. कॉलेजच्या प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी महाविद्यालयाच्या वाटचालीचा आणि उपक्रमांचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक व्यवहारांविषयी जागरूकता निर्माण करणे आणि आर्थिक निर्णयक्षमता विकसित करणे यासाठी अशा चर्चासत्रांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

डॉ. सय्यद अजरुद्दीन म्हणाले, १९५१ पासून आजपर्यंत भारताने टप्प्याटप्प्याने प्रगती साधली आहे. सध्या देशासमोर विकासाच्या अनेक नवीन संधी उपलब्ध आहेत. डॉ. विजयकुमार ककडे म्हणाले, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, मोबाईल बँकिंग आणि डिजिटल पेमेंटचा वापर करताना आर्थिक शिस्त पाळणे, मजबूत पासवर्ड वापरणे आणि गोपनीय माहिती सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे. डॉ. केदार मारुलकर म्हणाले, गुंतवणूक करताना इतरांचे अनुकरण करण्याऐवजी उपलब्ध माहितीचे विश्लेषण करून जोखमीचे मूल्यमापन करावे. सूत्रसंचालन स्वाती कांबळे यांनी केले. निलेश क्षीरसागर यांनी आभार मानले. व्यासपीठावर ताराराणी विद्यापीठाचे उपाध्यक्ष डॉ. एस. एन. पवार, सचिव प्राजक्त पाटील, प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर, डॉ. सागर वाळवेकर, निलेश क्षीरसागर आदी उपस्थित होते.

11 OCT 2026

जनप्रवास

दृष्टीदिव्यांग विद्यार्थ्यांचा एम.ए. इतिहास अभ्यासक्रमास प्रवेश

दूरशिक्षण, ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे सत्कार



दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामध्ये अभ्यासक्रमाची पुस्तके देऊन दृष्टीदिव्यांग विद्यार्थ्यांचे स्वागत करताना डॉ. प्रतिभा पाटणकर. सोबत डॉ. मुफीद मुजावर व दिलीप मोहाडीकर.

जनप्रवास : कोल्हापूर

शिक्षणाची जिद्द आणि आत्मविश्वास यांचे प्रेरणादायी उदाहरण ठरत तीन दृष्टीदिव्यांग (अंध) विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण, ऑनलाईन शिक्षण केंद्रात एम.ए. (इतिहास) अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला.

दृष्टिहीन असूनही उच्च शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा आणि चिकाटीच्या बळावर हणबरवाडी येथील अंध युवक मंच संचालित अंध मुला-मुलींचे निवासी वसतिगृह येथील पवन कागले, विकास पाईकराव तसेच पलूस (जि.सांगली) येथील अशोक चौगुले या विद्यार्थ्यांनी दूरशिक्षणाचा पर्याय स्वीकारला. अशोक चौगुले यांनी या अगोदर दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातून समाजशास्त्र व राज्यशास्त्र या विषयातून एम.ए.पदवी प्राप्त केली. या विद्यार्थ्यांचे कुलसचिव डॉ.विलास शिंदे, संचालक डॉ. प्रतिभा पाटणकर, उपकुलसचिव विनय शिंदे, समन्वयक डॉ. कृष्णा पाटील, दिलीप मोहाडीकर, इतिहास विषयाचे डॉ. मुफिद मुजावर यांनी अभिनंदन केले.